# बालविश्वातला आनंद – गरवारे बालभवन
# रौप्यमहोत्सवी गरवारे बालभवन

**माधुरी सहस्त्रबुध्दे**

पुण्यातल्या सारसबागेसमोर तिथल्या गणपती इतकंच पवित्र आणखी एक ठिकाण आहे ते म्हणजे गरवारे बालभव! गेली २४ वर्षे अव्याहतपणे चालू आहे. 'आनंदी बालपण' हा लहान मुलांचा हक्क आहे आणि त्यांना ते मिळवून देणं आपणा मोठ्या माणसांचे कर्तव्य! हे कर्तव्य तिथे निष्ठेने पार पाडलं जातंय. हे देवकार्यच होय.

१ सप्टेंबर १९८५ रोजी गरवारे बालभवनाच्या उद्घाटनप्रसंगी मी व माझ्या एस.एन.डी.टी. महाविद्यालयातील 'मुलं आणि संपर्क माध्यमे' अभ्यासक्रमाच्या वर्गमैत्रिणी एक गीत गायले होते. डॉ. श्यामला वनारसे लिखित 'बालभवन हवे, आम्हाला बालभवन हवे' हे ते संकल्पना गीत होते. आज या घटनेला २४ वर्षे झाली. यावर विश्वासच बसत नाहीये. मात्र या गीतात वर्णन केल्याप्रमाणे मुलांया जीवनात आनंदाचे लक्ष दिवे लावण्याचे काम (अपेक्षा) इथे उभारले गेले आहे. या पहिल्या दिवसापासून गरवारे बालभवनच्या वाटचालीची मी साक्षीदार आहे.

खरं तर पुणे महानगरपालिका आणि गरवारे ट्रस्ट यांचा हा संयुक्त उपक्रम! आबासाहेब गरवारे मुलांबाबतची दूरदृष्टी जात जशी महत्वाची तसाच पुणे मनपा चा वाटाही मोलाचा!! एवढी मोठी आणि मोक्याची जागा मुलांच्या उपक्रमासाठी कायमची उपलब्ध करून दिल्याबद्दल मनपा अभिनंदनास पात्र आहे. इतरही काही शहरातील नगरपालिकांनी पुणे मनपा चे अनुकरण करून बालभवनांना जागा उपलब्ध करून दिलेली आहे.

हजारो मुलं, पालक, जोडलेल्या अनेक संस्था, कार्यकर्त्या असं हे एक विशाल कुटुंब आहे आणि त्याची धुरा सुरुवातीपासूनच संचालिका म्हणून श्रीमती शोभा भागवत या समर्थपणे वहात आहेत. शालेतर उपक्रम असं या संस्थेचं स्वरूप आहे. रोज संध्याकाळी मुलं इथे येतात, मजेत खेळतात, व्यायाम, खेळ, गाणी, गोष्टी हे तर रोजच असतं. शिवाय मधून मधून चित्रकला, हस्तकला, नृत्य, अभिनय याचीही जोड असते. सणवार साजरे होतात. बॅडमिंटन, स्केटिंग, तायक्वोंदो यासारख्या खेळांचं विशेष प्रशिक्षण दिलं जातं. तर कधी कखी गोरे सरांच्या संकल्पनेतली सर्व खेळ शिबिरं घेतली जातात. कारण प्रत्येक खेळ खेळायला



वेगेवेगळी कौशल्ये लागतात. लंगडी, खोखो, कबड्डी, डॉज बॉल, लगोरी, आटचापाटचा सारखे निरनिराळे खेळ खेळल्याने त्यातील वेगवेगळी कौशल्ये मुलं आत्मसात करतात व ती इतरही खेळ खेळताना त्यांना उपयोगी पडतात.

पण इथे स्पर्धेला उत्तेजन नाही तर सहभागाला महत्व आहे. अनुभव घेऊन पहाण्यावर भर आहे. त्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. प्रत्येक मुलाला सर्व गोष्टींची ओळख झाल्याने व्यक्तिमत्वात एकारलेपणा येत नाही.

मुळात पंडित नेहरूंनी 'बालभवन' ही संकल्पना भारतात आणली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच दिल्लीत जवाहर बालभवन सुरू झाले. मुलांच्या लाडक्या चाच नेहरूंनी त्यासाठी स्वत:चे घर दिले. देशातल्या प्रत्येक छोट्याशहरात, छोटीछोटीबालभवनं सुरू व्हावीत अशी नेहरूंची इच्छा होती.

पुण्यात आजमितीला अंदाजे १५० 'बालभवने' आपापल्या भागात काम करीत आहेत. त्यापैकी सुमारे ४० बालभवनातील आम्ही कार्यकर्ते 'बालविकास समूह' नावाने एकत्र जमतो. 'बालदिनी एखादा एकत्र मोठा कार्यक्रम करतो. त्याचं नेतृत्व अर्थातच शोभाताईंकडे असतं.

सामाजिक जाणीवेचं उत्तम भान असलेल्या शोभा भागवत 'समाजातली सगळी मुलं आपली आहेत' असं मानतात. त्यामुळे अशा उपक्रमात बालभवनातील मुलांबरोबरच वंचित, उपेक्षित व विशेष मुलांचा सहभाग असतो. 'एकलव्य' संस्थेतील मुलं इथं रोज खेळायला येतात. तर 'मासूम' आणि 'सर्वेषां सेवा संघ' तसेच कास्प प्लान, स्वाधारच्या कार्यकर्त्यांसाठी इथे शिबिरं घेतली जातात. दिवाळीला रिमांड होममधल्या मुलांसह दिवाळी साजरी होते. मूकबधिर व इतर विशेष मुलं वेगवेगळ्या कार्यक्रमांना हजेरी लावतात.

शोभाताईंच्या लेखन आणि भाषण या दोन गुणांमधून त्यांनी बालभवनचं हे कार्य महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचवलं आहे.

शाळेत आणि घरी जे आनंदानुभव मुलांना मिळत नाहीत ते बालभवनमध्ये मिळतात. तिथलं मोठं मैदान आणि तिथलं स्वातंत्र्य मुलांना फुलवतं.

बालभवनचा भक्कम वैचारिक पाया सुरुवातीपासूनच त्याच्या प्रमुख सल्लागार डॉ. श्यामला वनारसे यांनी घालून दिला आहे. बालभवनच्या स्थापनेपासून ते आजतागायत त्याचं मोलाचं मार्गदर्शनही कार्यकर्यांना लाभत आहे. गेल्या २५ वर्षांत पुण्यात बालभवन हा केवळ एक उपक्रम न रहाता ती चळवळ बनली आहे आणि तिचं लोण केवळ महाराष्ट्रापुरतं न रहाता गुजरात, गोवा कर्नाटकआणि नेपाळ येथेही पसरलं आहे. गेल्या प्रशिक्षणाला नेपाळहून आठ

कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती आणि परत जाऊन तेथे काम सुरू करण्याचा मनोदयही समारोपात व्यक्त केला होता.

'कार्यकर्यांचं प्रशिक्षण' ही बालभवनची आणखी एक खासियतऋ दरवर्षी फेब्रुवारी आणि जुलै महिन्यात १५-१५ दिवसांची प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात. अशी सुमारे ५० शिबिरे आजवर झाली आहेत. त्यात प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थींची संख्या ३,५०० च्या वर आहे. ह्यापैकी अनेकांनी आपापल्या ठिकाणी, आपआपल्या गावी मुलांबरोबर काम करायला सुरुवात केली आहे.

आजपर्यंत झालेल्या पन्नासही शिबिरात मी शिबिरार्थींशी संवाद साधायला गेले होते. हा कोर्स पुरा केल्यावर आपल्या मुलांसंबंधीच्या दृष्टीकोनात अमूलाग्र बदल घडल्याचे प्रशिक्षणार्थी सांगतात. शोभाताई व त्यांच्या सहकारी वासंतीताई, भारतीताई, सुवर्णाताई वगैरे शिबिरातील मंडळींना अतिशय आत्मियतेने ज्ञान देतात व प्रेरित करतात हे मी पाहिलेलं आहे. शोभाताईंच्या 'ऋजु' व्यक्तिमत्वामुळे ह्या सगळ्या व्यक्ती त्यांच्याशी जोडलेल्या रहातात. ह्या प्रशिक्षणासाठी वयाची व शिक्षणाची अट नसल्याने अगदी ९ वी व १० वी झालेल्या मुली तसंच आजी आजोबाही कोर्सला प्रवेश घेतात. क्वचित पुरुष मंडळीही हजेरी लावतात.

खरोखरी मुलांबरोबर काम करण्याची समाजातील गरज फार मोठी आहे आणि त्यासाठी पुढे येऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी. हे व्यस्त गुणोत्तर चांगल्या व्यक्तींनी पुढे येऊन बदलण्याची गरज आहे. पण हा 'नफा' मिळविण्याचा 'व्यवसाय' नसल्याने ज्यांना खरोखर आतूनच प्रेरणा आहे अशा व्यक्तीच या क्षेत्रात टिकतात.

आता परिस्थिती थोडी बदलत आहे. परदेशात स्थायिक झालेल्या आपल्या मुली इकडी सुट्टीला आल्यावर इथलं प्रशिक्षण घेऊन परदेशात प्राध्यापक असं काम करत आहेत. काही तरुण डॉक्टर्स, इंजिनिअर्स आणि आय.टी. प्रोफेशनल्स महिला स्वत:च्या मुलांना अधिक चांगलं समजून घेता यावं यासाठी हा अभ्यासक्रम पूर्ण करताना दिसत आहेत. अशाच एका प्राध्यापिकेने मुलगी झाल्यावर दोन वर्षांची रजा घेऊन हे प्रशिक्षण घेऊन तिच्यासाठी वेळ द्यायचं ठरवल आहे. पण ही उदाहरणं अपवादात्मक!

परदेशात राहिलेल्या पालकांना तर असे उपक्रम अविश्नसनीय फी मध्ये चाललेले वाटतात. परवाच लंडनहून आलेली एक पालक मला भेटली. माझ्या 'बालरंजन'ची मासिक फी मी तिला १२५ रु सांगताच तिने विचारले की त्याच्या पुढचं एक पूज्य लिहायचं राहिलं आहे का? १२५० रुपये किंमतीच्या गोष्टी तुम्ही १२५ रुपयात देतायं याचं आश्चर्य तिच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होतं. बालभवनच्या उपक्रमाचं असंच आहे. परदेशात त्यांच्या मुलांना असे उपक्रम अनुभवायला मिळत नाहीत. मग अशा 'वंचित' मुलांना 'प्रवेश बंद' किंवा 'वेटिंग लिस्ट'च्या काळात विशेष जागा करून सामावून घेतलं जातं.



मुलांसाठीच्या पुस्तकाचं प्रकाशन हा बालभवनचव एक उल्लेखनीय उपक्रम. ज्येष्ठ वैज्ञानिक अरविंद गुप्ता यांनी जगभरातलं उत्तम बालसाहित्य गोळा करून ते हिंदीत रूपांतरित करण्याचं मोलाचं काम 'भारत ज्ञान विज्ञान समिती'च्या माध्यमातून केलं. तेच साहित्य बालभवनच्या 'कज्ञा कज्ञा मरू' प्रकाशनाने मराठीत आणलं. हा काही व्यापार नव्हे! १०-१५-२० रुपये इतक्या अल्प किंमतीत ही पुस्तकं मुलांना उपलब्ध करून देणं ही परवडणारी गोष्ट नव्हे. त्यामुळेच ही पुस्तकं जरी छापली तरी ती दुकानांमधून विक्रीलव ठेवणं शक्य होत नाही. तरी देखील मुलांच्या हाती चांगलं साहित्य जावं, मुलांनी वाचतं लिहीतं व्हावं यासाठी केलेला हा खटाटोपआहे. अनुवादित साहित्याबरोबरच गेल्या वर्षी बालदिनी बालनभवनच्याच छोटचा सई लिमयेचं 'मनातली शाळा' हे पुस्तक बालभवननं प्रकाशित करून नवाच पायंडा पाडला.

इथल्या सहली ही एक आनंदाची पर्वणीच! पण स्पेशल बस करून सहली नेणं आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे सहसा जवळपासच्या सहलींना रिक्षा करून नेलं जातं. मला असं वाटतं की पुण्यात वेगवेगळ्या कंपन्यांच्जा मिनी बसेस आहेत. कंपन्यांच्या सुटीच्या वारी गुरुवारी किंवा रविवारी त्या मोकळ्या असतात. त्यांना त्या त्यांच्या भागातल्या बालभवनांना अल्प दरात उपलब्ध करून दिल्या तर मुलांना आणखी ठिकाणे दाखविणे शक्य होईल.

एप्रिल-मे महिना म्हणजे शिबिरांची नुसती धमाल! सुमारे ३० प्रकारची शिबिरं घेतली जातात. ह्या शिबिरांना पालक पुण्यात येऊन मुक्काम करून मुलांना आवर्जून पाठवितात. 'खुल जा सिम सिम' हे एक असंच बालकप्रिय शिबिर. कल्पनाताईंचं 'वाचनाचं प्रेम' आता सुटीपुरते न रहाता वर्षभर झिरपू लागलं आहे. शोभाताई 'चालत चालत पुणे पाहू' शिबिरातून मुलांना आपल्याच शहराची ओळख करून देताहेत. ती ही पहाटेच्या आल्हाददायक वेळेत आणि ते ही चालत चालत. उमा बापटांचं १ ॥ ते ३ वयोगटातील मूल आणि त्याची आई यांच्यासाठी असलेलं 'आईचं शेपूट' शिबिर शेपटासह आईला नवीन अनुभवातून नेतंय. मे महिन्यात शिबिरांची अखेर होते ती पालकांच्या गंमत स्पर्धांनी. त्यांची बक्षिसंही गंमतीशीर असतात.

'शेती' हा बालभवनातला आगळा वेगळा उपक्रम. यात मोसमानुसार भाज्या, फळभाज्या, पालेभाज्या, फुलझाडे ल फळझाडे लावून मुलांना बिया पेरण्यापासून ते फळ येईपर्यंतच्या वाटचालीचं निरीक्षण करायला प्रशांतदादा मुलांना दृष्टी देतोय.

'गरवारे बालभवन' ची जागा शहराच्या मध्यस्तीत आहे. ती सतत मुलांनी फुललेली असते. तिथे एक अद्ययावत पाळणाघर सुरू व्हावं अशी शोभाताईंची इच्छा आहे. २५ व्या वर्षात दर महिन्याला एक मोठा कार्यक्रम करायचा त्यांचा मानस आहे. यंदा माजी विद्यार्थी, माजी ताई,

माजी पालक यांचेही मेळावे होतील. ज्यामध्ये इथल्या आनंदक्षणांची ते उजळणी करतील. ऑर्कुट वर बालभवनची कम्युनिटी आहे त्यावर हे सदस्य संवाद साधतील. पंचवीसावं वर्ष हे निमित्त असतं. मागे वळून पाहून आढावा घेण्याचं – सिंहावलोकनाचं! या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांना काही 'शेअर' करायचं असेल तर www.garwarebalbhavanpune.org संपर्क करू शकतील. 'दुनियेत कुठंही जाऊ परी इथेच परतुनी येऊंहे साध्य करता येईल.

गरवारे बालभवन २५ व्या वर्षात पदार्पण करीत असताना एक लक्षात येतंय की ही एक संस्था राहिली नसून चळवळ झालीय आणि तिची गरज अमर्याद आहे. ह्या चळवळीचं महत्व ओळखून समाजाने त्याला प्रतिसाद द्यायला हवा. पुण्यात आता विविध विशेष खेळांच्या नवनवीन अकादमी उदयाला येत आहेत. पण त्या खेळांसाठी त्यांना 'फिट' अशी मुलं एकदम कशी मिळणार? त्यासाठी लहानपणापासून (३ ते १२ वयोगटातील) मुलांना व्यायाम आणि खेळाची गोडी लावणारी ह्यातली मुलभूत कौशल्य देणारी बालभवने ही पायाभूत गरजेची आहेत.

त्यासाठी आगामी निवडणुकीच्या तोंडावर आपण आपल्या भागातील आमदाराकडे, नगरसेवकाकडे 'प्रत्येक वॉर्डात किमान एक बालभवन' अशा अजेंडचाचा आग्रह धरायला हवा. त्यासाठी म.न.पा. ने मैदाने उपलब्ध करून द्यायला हवीत.

आपल्या शहरातील पुढची पिढी जर शारीरिकदृष्टचा सुदृढ आणि मानसिादृष्टचा संतुलित घडायला हवी असेल तर मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशी ठिकाणे निर्माण करण्याबाबत, उपलब्ध करण्याबाबत आपल्याला गांभीर्याने विचार करावाच लागेल.

बालविश्वात खूप मोठा आनंद निर्माण करणाऱ्या आणि आता २५ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या गरवारे बालभवनच्या गलबताला आणि त्याच्या सप्तान शोभाताई भागवतांना पुढील सुखकर प्रवासासाठी, वाटचालीसाठी लाख लाख शुभेच्छा!

माधुरी सहस्त्रबुध्दे